संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# जाहीरनामा की न केलेल्या कामांचा पंचनामा

येत्या लोकसभा निवडणुकीत आपली सुरक्षिता टिकेल की नाही याचीच भीती वाटत असलेल्या काँग्रसने आपल्या जाहीरनाम्यामध्ये विविध सुरक्षा योजनांच्या घोषणा केल्या आहेत. यापूर्वीच देशातल्या सामान्य जनतेसाठी अन्न सुरक्षा योजना घोषित झालेली आहे तर आता स्वत: घरांपासून आरोग्य, रोजगार, निवृत्ती वेतन यासारख्या योजनांचीही काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यामध्ये घोषणा केली आहे. सामान्य मतदार आपल्या बाजूला राहावा यासाठी काँग्रेसने जाहीरनाम्यामध्ये उदार धोरण अवलंबलेले दिसते. परंतु या योजनांवर लोकांचा कितपत विश्वास बसेल याबद्दल शंका आहे. २००४ ते २०१४ या दहा वर्षांत सामान्य माणसाच्या हाती काहीच लागले नाही. फक्त बड्या भांडवलदारांचे उद्योगपतीचे उखळ मात्र पांढरे झाले. देशाचा विकास आणि स्थैर्य या दोन मुद्द्यांना केंद्रस्थानी ठेवून जाहीरनामा तयार केलेला दिसतो. दुर्दैवाने सामान्य माणूस किंवा मतदार हा सध्या इतका हताश आणि हतबल आहे की त्याला त्याचे महिन्याचे पैशाचे वेळापत्रकच सांभाळता येत नाही. कमाईपेक्षा खर्च जास्त होत असल्यामुळे भडकत्या महागाईशी तो सामना करू शकत नाही. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती २००४ पेक्षा २०१४ मध्ये पाचपटीने वाढल्याचे दिसून येते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती महागाई रोखण्याबाबत मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने कोणतीही ठोस उपायोजना केली नाही. उलट गॅस सिलिंडरच्या किमती वाढवण्यापासून ते त्यांची संख्या १२ वरून ९ करण्यापर्यंत अत्यंत जाचक असे निर्णय घेतले. भ्रष्टाचाराचा हैदोस थांबायला तयार नाही उलट या भ्रष्टाचारामुळे महागाई आणखीनच वाढत गेली, सरकारचा खर्च अव्वाच्या सव्वा वाढला, सरकारी तिजोरी लुटण्याचेच काम झाले. अशा सगळ्या उफराट्या कारभारामुळे सामान्य माणसाला कोणत्याही प्रकारचा दिलासा मिळालेला नाही. तो मतदार आता काँग्रेसच्या या जाहीरनाम्यावर विश्वास ठेवेल असे वाटत नाही.

## लोकांचा विश्वास कसा बसणार

या जाहीरनाम्यात दिली गेलेली आश्वासने म्हणजेच गेल्या जाहीरनाम्यातली उधार उसनवारी म्हणावी लागेल. कारण १० वर्षांमध्ये काँग्रेसने दिलेली कोणतीच आश्वासने पूर्ण झाली नाहीत. २००९ च्या निवडणुकीत मनमोहनसिंग यांनी १०० दिवसांत महागाई कमी करू अशी वल्गना केली होती तर ५० लाख तरुणांना रोजगार देऊ अशा प्रकारची आशा जागवली गेली होती. या दोन्ही गोष्टी पूर्ण झाल्या नाहीत, महागाई १०० दिवसांत कमी झाली नाहीच, उलट १०० पट मात्र वाढली. आता देखील १० कोटी रोजगार निर्माण करण्याचे स्वप्न या जाहीरनाम्यामध्ये दाखविले गेले आहे. ज्या सरकारला १० वर्षांत ५० लाख रोजगार देता आले नाही ते सरकार आता १० कोटी रोजगार देण्याचा भंपकपणा दाखवित आहे. या जाहीरनाम्यातला सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे काँग्रेसचे सरकार जर पुन्हा सत्तेवर आले तर सरकारी नोकरभरतीनंतर आता खाजगी कंपन्यामध्ये ही नोकरभरती आरक्षण ठेवेल, म्हणजे समाजातल्या खालच्या वर्गाला मोठ मोठ्या कंपन्यांमध्ये सहजपणे नोकऱ्या मिळू शकतील ही गोष्ट अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकांसाठी निश्चितच लाभदायक ठरू शकेल. परंतु अशा प्रकारच्या आरक्षणाबरोबर सरकारी कार्यालयामध्येसुध्दा आरक्षणाचे धोरण नीट अवलंबिले गेले पाहिजे. आज सरकारी कार्यालयामुळे आरक्षित जागा भरल्या जात नाहीत, उमेदवार मिळत नसल्याचे कारण सांगितले जाते अशा वेळी खाजगी कंपन्यांमध्ये हे आरक्षण राखले जाईल याची खात्री देता येत नाही. निवडणूक जिंकण्यासाठी ही युक्ती चांगली जरी असली तरी त्याला राजकीय वास असल्यामुळे त्याला भांडवलदार आणि उद्योगपती कितपत पाठिंबा देतील हे सांगता येत नाही. म्हणूनच जाहीरनाम्यातील अनेक गोष्टी केवळ लोकांचे मत आकर्षित करण्यासाठी आहेत असे म्हणावे लागेल.

## जाहीरनाम्याचा उपचार

अर्थात निवडणुकांमध्ये घोषित होणारे जाहीरनामे म्हणजे भूलथापा देणारे कागदी बाड असते, केवळ एक उपचार म्हणून आणि लोकांना आम्ही कसे कर्तबगार आहोत हे दाखविण्यासाठी हा सगळा उपद्व्याप केला जातो. आणखीन थोड्या दिवसांत भारतीय जनता पक्षाचा जाहीरनामा प्रसिध्द होईल, त्यातही अशीच बंडलबाजी केलेली असेल. फक्त विकासाच्या मुद्द्यावर वेगळे प्रस्ताव मांडून काँगेसपेक्षा आपण कसे वेगळे आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न भारतीय जनता पार्टी करेल. परंतु आज काँग्रेसला दहा वर्षे सत्ता उपभोगायला मिळाल्यानंतरही हा पक्ष जर रोजगार आणि महागाईच्या अवतीभोवती फिरत असेल तर मग युपीए सरकारला कोणतेच ठोस काम करता आलेले नाही हे आपोआप सिध्द होते. मनमोहनसिंग यांच्यासारखा अर्थतज्ज्ञ पंतप्रधान झाला, या दहा वर्षांत देशाचा आर्थिक कायापालट झाला असता तर एक मोठी औद्योगिक झेप सरकारला घेता आली असती. परंतु घोटाळ्यामागे घोटाळे करून या सरकारने स्वत:चीच बेईज्जती करून घेतली. आज भारतीय जनता पार्टीशी कोणत्या मुद्द्यांवर सामना करावा असा प्रश्न काँग्रेसला पडलेला दिसतो असे हा जाहीरनामा पाहिल्यानंतर वाटायला लागते. धर्मनिरपेक्षता किंवा जातीयवाद या दोन मुद्द्यांवर काँग्रेसचे नेते भाजपावर टीका करतात तर भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी हे केवळ विकासाचाच मुद्दा मांडून काँग्रेसला कोंडीत पकडत असतात. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात राहुल गांधी यांचा वरचष्मा दिसतो. सामान्य मतदार आपल्या बाजूला कसा वळेल यासाठी जाहीरनाम्याचा ८० टक्के भाग खर्च झालेला आहे. खरे तर त्याला जाहीरनामा न म्हणता काँग्रेसने न केलेल्या गोष्टींचा पंचनामाच म्हणायला हवा.